# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### वाशिम जिल्हयातील प्रस्तावित रिसोड लघु औद्योगिक क्षेत्र रद्द करून त्याऐवजी नवीन औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेबाबत

**(१) ४२७७ (२२-१२-२०१४). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील रिसोड येथे प्रस्तावित लघु औद्योगिक क्षेत्र स्थानिक वाद व मा.न्यायालयीन प्रकरणामुळे विकसीत होऊ शकत नसल्यामुळे सदर क्षेत्र रद्द करून त्याऐवजी मोठेगांव या गावाजवळील नवीन औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेबाबतची मागणी तत्कालीन लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२७-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

तथापि मौजे मोठेगाव येथे औद्योगिक क्षेत्रासाठी ५० ते ६० हेक्टर जमीन व पैनगंगा नदीवरुन पाणी उपलब्ध होऊ शकेल, त्यामुळे नवीन रिसोड औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेबाबत आदेश द्यावे असे निवेदन तत्कालीन लोकप्रतिनिधींनी तत्कालीन उद्योग मंत्री यांना डिसेंबर, २०१२ मध्ये निवेदन दिलेले आहे.

(२) व (३) मौजे मोठेगाव येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेबाबत प्रकरण ६ लागू करण्याबाबतची अधिसूचना दिनांक ३१/०३/२०१७ रोजी निर्गमित केलेली आहे. पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राज्यातील औद्योगिक महामंडळाने उद्योजकांना दिलेला परंतु न वापरण्यात आलेला भुखंड परत घेण्याबाबत

**(२) १३२४४ (१०-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक महामंडळाने उद्योजकांना दिलेला व न वापरलेला भुखंड परत घेण्यात येईल अशी घोषणा मा.उद्योग मंत्र्यांनी केली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबादच्या वाळुज एम.आय.डी.सी. तील बजाज आटो कंपनीकडे शेकडो एकर जमीन सामाजिक वनिकरणाच्या नावाने पडून आहे परंतु कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एम.आय.डी.सी. ने औरंगाबाद चिकलठाणा क्षेत्रातील भूखंड क्र.६१ लगत असलेली खुली जागा व सर्विस रोडसाठी राखीव असलेली जागा एका चित्रपट गृहाला दिल्याच्या तक्रारीवरही सन २०१२ पासून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वर नमुद केलेल्या जमीनी /भुखंड केव्हा परत घेण्यात येणार आहेत, तसेच, अवैधपणे भुखंड वाटप करुन ग्रीन झोन व रस्त्याची जागा वाटप करणा-या अधिकारी/पदाधिका-यांविरुध्द फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करणार आहे काय ?

**श्री. सुभाष देसाई (२७-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी बाब नाही, औरंगाबादच्या वाळुज एम.आय.डी.सी. तील मे. बजाज ऑटो कंपनीकडील बांधकामासाठी शिल्लक असलेल्या जागेपैकी १७१८१५० चौ.मी. जागेवर उद्योग विस्तार प्रस्तावित आहे.

(३) हे खरे नाही.

औरंगाबाद चिकलठाणा क्षेत्रातील खुली जागा क्र. २४/पार्ट ही जागा महामंडळाच्या सामायिक सुविधा केंद्र, भूखंड क्र. P-६० व भूखंड क्रमांक P -६१ या ३ भूखंडाकरिता २० मी. रुंदीच्या सेवा रस्त्यासाठी ठेवण्यात आली होती.त्यापैकी सामायिक सुविधा केंद्र हा महामंडळाचा भूखंड असल्याने त्यास महामंडळाचा सर्व्हिस रोड आहे. पी-६१ भूखंड हा अर्जदाराचा आहे व पी-६० हा भूखंड जिमखाना क्लब प्रा. लि. यांचा वाटप केलेला आहे. पी-६० व पी-६१ या दोन भूखंडाना सार्वजनिक बांधकाम विभागाने थेट ॲक्सेस दिल्यामुळे रस्त्याची आवश्यकता नाही. त्यामुळे खुली जागा क्र.-२४ चे व्यापारी भूखंडात रुपांतर करण्यात येऊन त्यास भूखंड क्र. P-६१/ पार्ट असा क्रमांक देण्यात आला आहे. सदरचा भूखंड दि. २१/०९/२००७ ते २०/०९/२०१६ या कालावधीसाठी ३ % पोटभाड्याची रक्कम वसूल करुन मे. पी. व्ही.आर लि. यांना वाणिज्य प्रयोजनासाठी पोट भाड्याने देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्हात नवोदय विद्यालय सुरु करण्याबाबत**

**(३) ४५१७१ (०५-०५-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रत्येक जिल्ह्यात नवोदय विद्यालय स्थापन करण्याच्या केंद्र शासनाच्या योजनेतून सन १९९६ मध्ये साकोली (जि.भंडारा) येथे सुरु करण्यात आलेले नवोदय विद्यालय भंडारा जिल्ह्याच्या विभाजनाच्या वेळी नवेगांवबांध (जि.गोंदिया) येथे हलविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्हा गत १३ वर्षापासून नवोदय विद्यालयाच्या प्रतिक्षेत असून या जिल्ह्यात नवोदय विद्यालय सुरु करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०७-२०१७) :** (१) होय.

(२) भंडारा जिल्हयात नवोदय विद्यालय सुरु करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे शिफारस केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर व ठाणे जिल्ह्यातील सुमारे साडेसात हजार आदिवासी बांधवांनी श्रमजीवी संघटनेच्या वतीने तहसीलदार कार्यालय (वाडा) येथे मोर्चा काढल्याबाबत**

**(४) ४८९१४ (२९-०४-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महागाई, कुपोषण व आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी पालघर व ठाणे जिल्ह्यातील सुमारे साडेसात हजार आदिवासी बांधवांनी श्रमजीवी संघटनेच्या वतीने तहसीलदार कार्यालय (वाडा) येथे दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निषेध मोर्चा काढून प्रशासनाचे लक्ष वेधले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आदिवासींच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण् कारणे कोणती आणि सदरचा निर्णय किती दिवसात घेण्याचे अपेक्षीत आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२७-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर मोर्चा भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेसाठी निधी उपलब्ध करून देणेसाठी आयोजित करण्यात आला होता.

(२) १) अमृत आहार योजनेस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांचे दि.०१.०२.२०१६ च्या पत्रान्वये निधी बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयांना त्यांचे मागणीनुसार वितरीत करण्यात आला.

२) महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ यांनी अमृत आहार योजनेच्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा केल्याशिवाय सदर योजनेचे काम सुरू करण्यास नकार दिला होता. त्यामुळे सदरची योजना निधी वाटपानंतरही पालघर जिल्ह्यामध्ये सुरू झाली नाही.

३) दि.०३.०५.२०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी व महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ यांचेमध्ये झालेल्या चर्चेनुसार अमृत आहार योजना सुरू करण्यास संघटनेने होकार दर्शविला असल्याने सदरची योजना माहे मे २०१६ पासून पालघर जिल्ह्यामध्ये सुरू करण्यात आली आहे.

(३) नाविन्यपूर्ण योजनेतून ३ ते ६ वर्षे वयोगटातील सर्वसाधारण श्रेणीतील मुलांसाठी अंडी व केळी योजना तसेच ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) सुरू करण्यात आली.

---

**सावरगाव (ता.चिमुर, जि.चंद्रपूर) येथील सर्वांग विकास विद्यालयाच्या संस्था संचालकांवर कारवाई करण्याबाबत**

**(५) ४९११५ (१६-०५-२०१६). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावरगाव (ता.चिमुर, जि.चंद्रपूर) येथील सर्वांग विकास विद्यालयातील गैरकारभारामुळे गावातील नागरिकांनी सदर विद्यालय बंद केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेच्या संस्थासंचालकांनी शाळेतील शिक्षकांना शैक्षणिक कालावधीच्या मध्येच कामावरुन मुक्त करुन दिले व विद्यार्थ्यांकरीता कोणतीही पर्यायी शिक्षणाची व्यवस्था उपलब्ध केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेने आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणारे विद्या वेतन परस्पर गहाळ केले असल्याची तक्रार प्रशासनाकडे करण्यात आलेली असुनही प्रशासनामार्फत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शाळेच्या संस्था चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२९-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही. सदर विद्यालयात इंग्रजी व गणित विषयांचे नियमित शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी वर्गात बसणे बंद केले होते व त्यामुळे विद्यालय बंद होते.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.
(४) सदर संस्थेचे वेतनेतर अनुदान थांबविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातीचा दाखला नसल्यामुळे शिष्यवृत्ती मिळणार नसलेबाबत**

**(६) ४९१९२ (२८-०४-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने नववी व दहावीत शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास त्यासाठी बंधनकारक करण्यात आलेल्या जातीचा दाखला मिळण्यास अनेक अडचणी येत असून, सदर अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याची सक्ती, परंतु अनेक ठिकाणी ग्रामीण भागांमध्ये ऑनलाईन सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास १५ हजार ५०० पैकी केवळ साडे पाच हजार विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार नववी आणि दहावीचे कोल्हापुर जिल्हयातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय अहोत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय. जातीच्या दाखल्याच्या अटीमुळे अडचण निर्माण होत असल्याने जिल्हयातील ११,१४५ विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला काढला नसल्याने त्यांना शिष्यवृत्ती मिळण्यास अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे ३३०६ इतक्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यात आली होती.
(४) व (५) ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना लाभ घेता यावा म्हणून जातीच्या दाखल्याची अट रद्द करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली असता, केंद्र शासनाने त्यांचे पत्र दि.१९.२.२०१६ अन्वये जातीच्या दाखल्याची अट शिथील करण्यता आली नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना जातीचे दाखले मिळावेत, यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करणेकरीता संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना दिनांक  २९.६.२०१५ व २८.६.२०१६ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली होती.

इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत बहुतांश विद्यार्थ्यांकडे जातीचा दाखला नाही. जिल्हयातील ९ वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचिज जातीच्या सर्व विद्यार्थ्यांना जातीचा दाखल देण्यासाठी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना कळविणेत आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष

**(७) ४९७५३ (१२-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात शासकीय धोरणांविषयी सर्व स्तरावर असंतोष असुन शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित मागण्यांकडे शासन नकारात्मकपणे पहात असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव शासनाकडे पाठपुरावा करुनही काही प्रतिसाद मिळत नसल्याने राज्यातील शिक्षण संस्था महामंडळ, माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, पश्चिम महाराष्ट्र संयुक्त महामंडळ, राज्य माध्यमिक शिक्षकेत्तर महामंडळ, कला शिक्षक, क्रिडा संघ इ. अनेक संघटना एकत्र येऊन आंदोलन करून शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे येथे मोर्चा काढला होता तद्‌नंतर राज्यातील शाळाही बंद ठेवण्यात आल्या त्याअनुषंगाने श्रीरामपूर शहर (ता. जि. अहमदनगर) येथील ११ तर तालुक्यातील ४० माध्यमिक शाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी केली आहे काय,त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२६-०७-२०१७) :** (१) नाही.

(२) व (३) अनुदानास पात्र घोषित केलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधित संघटनांनी आंदोलन करुन मोर्चा काढून शाळा बंद ठेवल्या होत्या.

शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले. तसेच, दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये पात्र शाळांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईच्या पश्चिम उपनगरातील जोगेश्वरी (पूर्व) येथील शारदा विद्यामंदिर दुर्गानगर येथील शाळेच्या संचालकाने तेथील शिक्षकांकडून पैसे घेऊन त्यांना फसविल्याबाबत**

**(८) ५२०१४ (२५-०५-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पश्चिम उपनगरातील जोगेश्वरी (पूर्व) येथील शारदा विद्यामंदिर दुर्गानगर या शाळेची मान्यता नसतांनाही शाळा नियमबाह्य सूरु असुन शाळेच्या संचालकाने तेथील शिक्षकांकडून पैसे घेऊन त्यांना फसविले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तेथील शिक्षकांनी मा. शालेय शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग व शिक्षण संचालक तसेच जोगेश्वरी पोलीस ठाणे यांना दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन देऊन संबंधित शाळेच्या संचालकावर व अनधिकृतपणे सुरु असलेल्या शाळेवर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित शाळेच्या संचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

शारदा विद्यामंदिर मराठी माध्यम, जोगेश्वरी (पूर्व) येथे जून २०१६ पर्यंत नियमबाहय शाळा सुरु होती. जून २०१६ पासून व्यवस्थापनाने सदर शाळा बंद केली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी शाळांकडून शालेय साहित्य खरेदी करण्यास होत असलेली सक्ती**

**(९) ५३८९३ (२२-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शाळांमधील शालेय साहित्य विक्रीस राज्य शासनाने सन २००४ मध्ये एका परीत्रकाद्वारे बंदी केली असताना सदर आदेशाकडे दुर्लक्ष करून खाजगी शाळांकडून शालेय साहित्य खरेदी करण्यास सक्ती केली जात असल्याचे माहे एप्रिल २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशाची सक्तीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०७-२०१७) :** (१) अशी बाब नाही.
(२) याबाबत क्षेत्रिय स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत  नाही.

---

**मुंबई शहरातील प्रदूषणाबाबत**

**(१०) ५४३९४ (२९-०८-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई जगातील पाचव्या क्रमांकाचे प्रदूषित शहर आहे असे जागतिक आरोग्य संघटनेने जाहिर केल्याचे माहे मे २०१६, मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील प्रदुषणात सन २०१४ पासून अधिकच वाढ झाली असून वाहनांची झपाट्याने वाढणारी संख्या तसेच शहरातील वाढते बांधकाम प्रकल्प या प्रमुख कारणास्तव लोकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे,  सदर प्रश्न लक्षात घेता याबाबत शासनाने कोणती कार्यवाही  केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२७-०७-२०१७) :** (१) होय.
(२) मुंबई महानगरात वाढत्या  वाहनांच्या व  बांधकाम प्रकल्पांच्या संख्येमुळे  हवेच्या प्रदूषणात वाढ झाली आहे.

वाहनामुळे होणाऱ्या प्रदुषणांवर आळा घालण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागामार्फत वाहनांची नियमित पीयूसी चाचणी केली जाते. बांधकामदरम्यान हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत अटी व शर्तीसह बांधकाम प्रकल्पांना संमतीपत्र प्रदान करण्यात येते. बांधकाम प्रकल्पासाठी उभारण्यात  येणाऱ्या आरएमसी प्लांटमुळे होणाऱे हवा प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी  महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण  मंडळाव्दारे दिनांक ०७.११.२०१६ रोजी आरएमसी प्लांट उभारण्यासाठी मार्गदर्शक तत्वांच्या नियमावलीबाबत अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत हायमास्टसाठी प्राप्त झालेला निधी दुष्काळाकडे वर्ग करण्याबाबत**

**(११) ५६८६४ (०१-०९-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला नाविन्यपूर्ण योजन अंतर्गत हायमास्ट बसविण्याच्या कामासाठी प्राप्त झालेला २ कोटी रूपयांचा निधी दुष्काळाची दाहकता लक्षात घेता दुष्काळाकडे वर्ग करण्याचा ठराव स्थायी समितीच्या माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठीत करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तदनंतर मा. पालकमंत्री, नाशिक यांनी देखील निधी दुष्काळाकडे वर्ग करण्याचे आदेश दिले असतानाही सदर आदेशाचे व ठरावाचे पालन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.पालकमंत्र्यांच्या आदेशाचे पालन न करण्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (३१-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

जिल्हा परिषद, नाशिक च्या दि.२९.०३.२०१६ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये हायमास्ट साठी प्राप्त झालेला निधी दुष्काळाकडे वर्ग करण्याच्या संदर्भात चर्चा करण्यात आली. परंतु प्राप्त निधी दुष्काळाकडे वर्ग करणेबाबतचा कोणताही ठराव करण्यात आलेला नाही.

(२) व (३) मा.पालकमंत्री, नाशिक यांचेकडून सदरचा निधी दुष्काळाकडे वर्ग करण्याबाबतचे कोणतेही आदेश जिल्हा परिषदेस प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे हायमास्टसाठी प्राप्त झालेला निधी दुष्काळाकडे वर्ग करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील रामटेक येथे वर्ग दहावी व बारावीचे कोचिंग क्लासचा व्यवसायासाठी होत असलेली जाहिरात**

**(१२) ५८०२२ (२२-०८-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील रामटेक येथे वर्ग दहावी व बारावीच्या कोचिंग क्लासच्या व्यवसायसाठी मोठ्या प्रमाणात लाखो रुपयांची जाहिरात करण्यात येत असून होर्डिंगवर गुणवंत विद्यार्थ्यांना आमिष दाखवून त्यांचे फोटो लावण्यात आले असल्याची धक्कादायक बाब माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने शिक्षणाचे बाजारीकरण करणाऱ्यांवर निर्बंध आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.?

**श्री. विनोद तावडे (२५-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
खाजगी कोचिंग क्लासकडून व्यवसायाची जाहिरात करण्याकरिता होर्डींग लावण्यात आले होते व त्यावर विद्यार्थ्यांचे फोटो होते.
(२) खाजगी शिकवणीवर निर्बंध आणण्यासाठी विधेयक तयार करण्याकरिता शासनाने दिनांक ४ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये समिती गठित केली आहे. समितीचा अहवाल सादर झाल्यावर त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई ग्रांट रोड येथील रोबर्ट मनी हायस्कुल व जुनिअर कॉलेजच्या मॅनेजमेंटचा मनमानी कारभार**

**(१३) ६३६९८ (२२-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई ग्रॅण्ट रोड येथील रॉबर्ट मनी हायस्कूल व जुनिअर कॉलेजच्या मॅनेजमेंटने विद्यार्थ्यांना बळजबरीने शाळेचा दाखला देवून इतर शाळा कॉलेजमध्ये जाण्यास माहे मार्च, २०१६ पासून भाग पाडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही शाळा कॉलेज बंद करण्या-या मॅनेजमेंटच्या मनमानी कारभाराबाबत तसेच प्रायमरी विभाग बंद केल्याबाबत तेथील लोकप्रतिनिधीनी मा. शिक्षण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे दिनांक २ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त निवेदनावर तसेच मनमानी करणाऱ्या मॅनेजमेंटवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबतची सध्य: स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२५-०७-२०१७) :** (१) होय.
(२), (३) व (४) याबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने शिक्षण उपनिरीक्षक यांनी चौकशी करुन, परिसरातील विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्यामुळे शालेय व्यवस्थापनास शाळा बंद करता येणार नाही असे संस्थेस कळविले आहे. तसेच नवीन प्रवेशाची कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

---

## नागपूर विभागातील अडीच हजार शाळा अग्निशमन यंत्र व संरक्षण भिंतीअभावी असल्याबाबत

**(१४) ६६९३७ (२७-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील अडीच हजाराच्यावर शाळांना अग्निशमन यंत्रे तसेच संरक्षण भिंती नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व शिक्षा अभियानातून सदर यंत्राकरीता निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा मार्गावरील पारडी येथील प्रकाश कृषी विद्यालयाच्या परिसरात सुरक्षा भिंती अभावी ट्रक शिरून ३ शाळकरी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने संरक्षण भिंत व अग्निशमन यंत्र न बसविणाऱ्या शाळांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबनाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे (१७-०७-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) पक्की संरक्षण भिंत नसल्यास तारेचे कुंपण वा काटेरी कुंपण बसविण्याचे आदेश आहेत. याची पूर्तता न करणाऱ्या शाळांबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी वसतिगृह व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचा पुरवठा झाला नसल्याबाबत

**(१५) ६७७२८ (२७-०१-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी वसतिगृह व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष सुरू होऊन दोन महिने उलटून गेले असतानाही अद्याप काही शालोपयोगी साहित्याचा पुरवठा झाला नसल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,

(२)असल्यास, याप्रकरणी शासनाने निविदा प्रक्रिया पूर्ण करून या विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२७-०७-२०१७) :** (१) व (२) शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तुंचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून न्युनतम दरधारकांना दि.०२.०७.२०१६ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यांत आले आहेत. त्यानुसार पुरवठा आदेश देऊन माहे ऑगस्ट, २०१६ पूर्वी पुरवठा पूर्ण करण्यांत आलेला आहे. चालू वर्षी दि.६ जून, २०१७ रोजी आदेश देण्यांत आले असून पुरवठा सुरु झालेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात अनुदानित तसचे विनाअनुदानित मराठी शाळांच्या समस्यांबाबत**

**(१६) ६८०५९ (२७-०१-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील अनुदानित तसचे विनाअनुदानित मराठी शाळांची समस्या अत्यंत गंभीर असल्याची बाब दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने विनाअनुदानित शाळांना अनुदान सुरु करण्यासाठी जे मुल्यांकन निकष लावले ते शहरी आणि ग्रामीण भागातील शाळा पूर्ण करुन शकत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रश्न भाग (१)व(२) बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०७-२०१७) :** (१) शासन निर्णय, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले. तसेच, दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये पात्र शाळांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे. त्यामध्ये नांदेड जिल्हयातील शाळांचा देखील समावेश आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तहसिलदार कार्यालयावर आदिवासींच्या वन हक्कासाठी काढण्यात आलेल्या मोर्चाबाबत**

**(१७) ६९८७७ (२४-०१-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तहसिलदार कार्यालयावर आदिवासींच्या वन हक्कासाठी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास कॉ.गोदावरी परूळेकर मार्क्सवादी विचार मंचाच्या वतीने मोर्चाचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींच्या प्रमुख मागण्या काय आहेत,

(३) असल्यास, सदर मागण्यांसंदर्भात शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२१-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत कोकाटपाडा शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय

**(१८) ६९९१६ (२७-०१-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत सुत्रकार कोकाटपाडा शासकीय आश्रमशाळेतील इ.७ वी च्या विद्यार्थ्यांना शौचालयास उघड्यावर जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरहू शाळेतील परिसरात अंधाराचे साम्राज्य असून १२X२० च्या खोलीत १०० ते १२५ विद्यार्थी बसविले जातात व त्याही वर्गावर गळके छप्पर व त्या छपरावर प्लास्टिक टाकूनही सतत पाणी गळत आहे अशी अवस्था या शाळेची आहे, हे ही खरे काय,

(३) सदरहू आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी असणा-या शौचालयास कोठेही दरवाजा नसून असलेले दरवाजे गंजून गेल्याने मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व विद्यार्थींनीची कुंचबणा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व गंभीर प्रकरणाची चौकशी होऊन आवश्यक ती डागडुजी व योग्य त्या सुधारणा बाबत शासन त्वरित कार्यवाही करणार आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०७-२०१७) :** (१) नाही.

शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सुत्रकार, ता.तलासरी, जि.पालघर येथे निवासी मुली ११० असून मुलंसाठी ४ शौचालये व मुले १६३ असून मुलांसाठी १० शौचालये आहेत.

(२) नाही.

शासकीय आश्रमशाळेमध्ये मुलींना राहण्यासाठी ३३ x ३५ च्या दोन रुमचा वापर करण्यात येतो. तसेच पावसाळा सुरु होण्याच्या आधी छताची दुरुस्ती करुन घेण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रकल्प अधिकारी, डहाणू कार्यालयाकडून मुख्यापकांना शालेय व्यवस्थापनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून, सदर निधीमधून मुख्यध्यापकांनी शौचालये, स्नानगृहे व दरवाजे दुरुस्ती करुन घेण्यात आलेले आहेत. आश्रमशाळांमध्ये वॉश कार्यक्रम राबविण्यात येत असून त्याअंतर्गत मुलांमुलींसाठी आणखी आवश्यक शौचालये बांधण्याचे प्रस्तावित आहे.

---

**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र फेरतपासणी अहवालाबाबत**

**(१९) ७०५३६ (२७-०१-२०१७). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कै.श्री. व.सु. पाटील तत्कालीन सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांच्या कालावधीत निकाली काढण्यात आलेल्या जात वैधता प्रमाणपत्राची फेरतपासणी केलेला अहवाल व मा. आयुक्त (आसप्रस) यांचा पुन:चौकशीचा अहवाल बेकायदेशीर नियमबाह्य व मा.उच्च न्यायालयाच्या अधिकारावर अतिक्रमण करणारा असल्यामुळे तो अहवाल फेटाळण्यात यावा, अशी विनंती लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ मे, २०१६ रोजी व त्या सुमारास मा. आदिवासी विकास मंत्री यांचेकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा अहवाल शासनाने फेटाळला आहे काय,

(३) सदरचा अहवाल फेटाळण्यात आलेला नसल्यास शासनाने अहवालातील कोणकोणते निर्देश स्विकारले आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०७-२०१७) :**(१) होय.

(२) नाही.

(३) या अहवालाच्या अनुषंगाने कै.व.सु.पाटील तत्कालीन सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांच्या दि.०६.०९.२०१० ते दि.०५.१०.२०११ या कार्यकालावधीत निर्गमित करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या वैधता प्रमाणपत्रांच्या प्रकरणांचे पुनर्विलोकन करण्यासाठी मा.उच्च न्यायालयामध्ये एक विशेष याचिका दाखल करण्यात यावी.

तसेच सदर कालावधीमध्ये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद या कार्यालयात कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी करण्यात यावी. तसेच ज्या शालेय अभिलेख्यांमध्ये अनियमितता आढळून आली आहे व ज्या शालेय अधिकारी/कर्मचारी यांचे गैरवर्तन आढळून आले आहे त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी असा शासनाने निर्णय घेतला आहे.

---

## सिंधुदूर्ग जिल्हयातील अनुदान न मिळालेल्या शाळांना अनुदान अदा करण्याबाबत

**(२०) ७१९७३ (१६-१२-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुदान निर्धारणानुसार सन २०११ - १२ अखेर पर्यत १४ कोटी ६३ लाख ६६ हजार २५२ रुपये अनुदान अखर्चित वसूल पात्र रक्कम भरणा केल्या शिवाय सिंधुदुर्ग जिल्हयातील अनुदान प्राप्त शाळांना वेतनेत्त्तर अनुदान दिले जाणार नाही असा निर्णय मा संचालक शिक्षण विभाग यांनी घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान प्राप्त शाळांचे वेतनेत्त्तर अनुदान, इंटरनेट सुविधा तसेच आरटीई अधिनियम २००९ नुसार माध्यमिक शाळांप्रमाणे शिक्षक दिर्घ मुदतीच्या रजेवर असेल तर त्याच्या रजा काळात हंगामी शिक्षक नेमण्याची मंजूरी असावी अशा मागण्यांचे निवेदन जिल्हा शिक्षक समितीच्या वतीने माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान संचालक, शिक्षण विभाग, पुणे यांना देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,अनुदान निर्धारणानुसार अखर्चित वसूल पात्र रक्कम भरणा केलेल्या आणि जिल्हा विभाग प्रशासनाची काहीही चूक नसताना शिक्षण संचालक पुणे यांच्या चुकीच्या पध्दतीमुळे गत ७ वर्षे वेतन्नेतर अनुदान मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त शाळांना अनुदान प्राप्त करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२७-०७-२०१७) :** (१) व (२) नाही.

(३) व (४) शासन परिपत्रक, वित्त विभाग दिनांक १७ एप्रिल, २०१५ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाना अनुदाने वितरीत करण्यापूर्वी सदर संस्थाकडून राज्य शासनास येणे असणारी रक्कम वसूल करुनच उर्वरीत अनुदान वितरीत करण्यात यावे असे आदेश आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून रुपये ८,१८,६६,६४४/-इतकी अखर्चित वसुलपात्र रक्कम शासनाकडे येणे बाकी आहे. सदर रक्कम शासनाकडे जमा केल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस वेतनेत्तर अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करता येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिबला येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळा येथील विद्यार्थ्यांना नवरात्र महोत्सवादरम्यान जेवण न मिळाल्याबाबत

**(२१) ७२६५३ (२७-०१-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिबला येथील शासकीय आश्रमशाळेतील जवळपास ६ ते ७ विद्यार्थ्यांना नवरात्र महोत्सवा दरम्यान शाळा प्रशासनाचे अनेक कर्मचारी रजेवर गेल्यामुळे या विद्यार्थ्यांना दैनिक रोजचे

जेवण मिळू शकले नाही, याबाबत दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास प्रकल्प अधिकारी यांचेकडे लेखी तक्रार करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती संबंधित शाळेतील अधिकारी व कर्मचा-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०७-२०१७) :**(१) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाली होती, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी करण्यांत आली. प्रस्तुत तक्रारीनुसार सत्यता आढळून आली नाही. नवरात्र महोत्सवा दरम्यान विद्यार्थ्यांना दररोज जेवण देण्यात आलेले असल्यामुळे एकही विद्यार्थी उपाशी राहिलेला नाही. त्यामुळे कर्मचारी दोषी नसल्याचे आढळून आले. यास्तव, संबंधित शाळेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पिंपळगांव राजा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील गुलशन-ए-हाफीजा या उर्दु प्राथमिक शाळेबाबत**

**(२२) ७३७७२ (१६-१२-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पिंपळगांव राजा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील गुलशन-ए-हाफीजा या उर्दु प्राथमिक शाळेला दि.१७ फेब्रुवारी २०१४ रोजीच्या पत्रान्वये शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत अनुदान मंजूर करण्यात येऊ नये असे आदेश दिले असतांनाही मुख्याधिकारी जि.प.बुलढाणा व शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प.बुलढाणा प्राथमिक यांनी उपरोक्त शाळेस अनुदान मंजूर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त शाळेला अनुदान मंजूर नसतांना तसेच मुख्याधिकारी यांनी दिनांक १२ एप्रिल,२०१६ पोषण आहार रद्द करण्याचा आदेश दिला असतांना देखील शिक्षणाधिकारी प्राथमिक जि.प. बुलढाणा यांनी उपरोक्त शाळेकडून पोषण आहाराच्या रक्कम वसुली बाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १६ जून, २०१६ रोजी उपरोक्त शाळेस अनुदान नसतांना देखील शाळेला मोफत पाठयपुस्तक १६ योजनेंतर्गत पुस्तके देण्यात आली असून यासर्व प्रकारांबाबत मुख्याधिकारी यांनी वारंवार तक्रारी करुन देखील एकाच शाळेबाबत उपरोक्त मुख्याधिकारी यांची असलेली सौम्य भुमिका या सर्व प्रकारणाबाबत संशयाचे वातावरण निर्माण करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०७-२०१७) :** (१) नाही. या शाळेस पुढील आदेश होईपर्यंत अनुदान मंजूर करु नये असे दिनांक १७ फेब्रुवारी २०१४ च्या पत्रान्वये दिलेले आदेश शासनाने दिनांक २ ऑगस्ट, २०१६ च्या पत्रान्वये रद्द केले.
(२) अनुदान टप्पा घोषित झालेल्या शाळेस शालेय पोषण आहार योजना लागू असल्याने व या शाळेस अनुदान मंजूरीचे आदेश कायम ठेवल्याने शालेय पोषण आहार देण्यात येत आहे.
(३) शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले. त्यामध्ये सदर शाळेचा समावेश आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील टंचाईग्रस्त गावांची पाणी टंचाई दूर करण्याबाबत**

**(२३) ७४१७९ (२०-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयात सन २०११ च्या जनगणनेनुसार १ हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेली १०७० गावे आहेत आणि हीच स्थिती कोकणातील अन्य जिल्हयांमध्ये देखील आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एक हजार लोकसंख्येच्या निकषामुळे उक्त गावांमध्ये मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजना राबविता येणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकणच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करून १ हजार लोकसंख्येचा निकष शिथिल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त जिल्हयातील कोणत्या तालुक्यांमधील गांवे,वस्त्या व वाड्या यांचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजनेत करण्यात आला आहे,
(५) असल्यास, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व उक्त जिल्हयात किती योजना सुरु करण्यात आल्या व मंजूरी देण्यात आल्या आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०७-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमामध्ये रत्नागिरी जिल्हयातील ११ नळ पाणी पुरवठा योजनांचा समावेश असून त्याकरिता रु.४५०२.८५ लक्ष इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर जिल्हयातील रत्नागिरी तालुक्यामधील ५, चिपळूण तालुक्यामधील ३ व संगमेश्वर, गुहागर व खेड तालुक्यातील प्रत्येकी १ योजनेचा समावेश सदर कार्यक्रमामध्ये आहे. सद्यस्थितीत सदर कार्यक्रमांतर्गत मौ.पोमेंडी (बु.), ता.जि.रत्नागिरी व मौ.खानू मावळंकरवाडी, ता.जि.रत्नागिरी या दोन योजनांच्या अनुक्रमे रु.१३७.४६ लक्ष व रु.५८.६९ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली असून उर्वरित योजनांचे प्रस्ताव अद्याप शासनास अप्राप्त आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक संवर्गातील पदांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव

**(२४) ७४३२३ (२८-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक संवर्गातील एकूण ५० पदावर पदोन्नती देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागातील सुमारे ९४७ पदे गेल्या अनेक वर्षापासून रिक्त असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विभागातील निरीक्षक संवर्गातील मंजूर २५२ पदांपैकी तब्बल १२२ पदे रिक्त आहेत, त्यामुळे यंत्रणेवर कामाचा ताण वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०७-२०१७) :** (१) दिनांक २७.३.२०१७ च्या आदेशान्वये एकूण पात्र ४० दुय्यम निरीक्षकांना निरीक्षक संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.

(२) माहे डिसेंबर, २०१६ अखेर राज्य उत्पादन शुल्क विभागातील विविध संवर्गातील १००१ पदे रिक्त होती.

(३) निरीक्षक संवर्गातील मंजूर २५२ पदांपैकी ९९ पदे रिक्त आहेत.

(४) राज्य उत्पादन शुल्क विभागातील विविध संवर्गातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येण्याऱ्या पदांसाठी आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहेत. तसेच विविध संवर्गातील पदोन्नतीने भरावयाच्या पदांबाबत पदोन्नतीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विद्यार्थी व पालकांच्या आर्थिक फसवणूकीला आळा घालण्यासाठी 'फी इंडिया' ॲप सुरु करण्यात आल्याबाबत**

**(२५) ७४३३० (२०-०४-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शाळा व कॉलेजमधून होणा-या विद्यार्थी व पालकांच्या आर्थिक फसवणुकीला बंधन घालण्याच्या दृष्टीने 'फी इंडिया' (फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन) हे ॲप सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ॲपवर कॉलेजची स्वच्छता, देखभाल खर्च, जिमखाना, ग्रंथालय फी, ओळखपत्र वाटप, बारावी परिक्षेचे ऑनलाईन अर्ज भरताना तसेच काही शाळा एनजीओला मदत म्हणून विद्यार्थ्यांकडून पैसे घेत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ॲपवर आलेल्या तक्रारी फोरमच्या वतीने थेट शिक्षण उपसंचालकांकडे मांडण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, व त्यानुसार संबंधित शाळा व कॉलेजांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२९-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (पालघर) येथील ऐतिहासिक पुरातन शिल्प व शिलालेख यांची झालेली दुरावस्था**

**(२६) ७५६०९ (२०-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील शूर्पारक म्हणून प्रसिद्ध असलेल्या ऐतिहासिक पुरातन शिल्प व शिलालेख यांची दूरावस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुरातन शिल्प व शिलालेख हे कपडे धुण्याचे दगड झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त शिल्प व शिलालेख यांची चोरी होत असून ते आंतरराष्ट्रीय बाजारात विकले जात असल्याची भीतीही स्थानिक इतिहासप्रेमी व रहिवाशांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त शिल्प व शिलालेखांचे जतन करण्याकरिता तसेच सदर ऐतिहासिक शिल्प व शिलालेखांचे संग्रहालय बनविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०१-०८-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) सदर स्थळाची संचालनालयाद्वारे पाहणी केली असता पुरातन शिल्प व शिलालेख सुस्थितीत असून मंदिर आवारात सुरक्षित असल्याचे आढळून आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी जिल्ह्यामधील अंगणवाड्यांना थेट अनुदान देण्याचा आराखडा आदिवासी विभागाने तयार केला असल्याबाबत

**(२७) ७८२२९ (१५-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१). राज्यातील आदिवासी जिल्ह्यामधील अंगणवाड्यांना थेट अनुदान देण्याचा आराखडा आदिवासी विभागाने तयार केला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे गर्भवती, स्तनदामाता आणि बालकांना चौरस आहार वेळेवर मिळणार असून माता आणि बालमृत्यू कमी होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना राज्यातील १६ जिल्ह्यामध्ये राबविण्यात येणार आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२७-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे. भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेअंतर्गत अंगणवाडी स्तरावरील "आहार समितीस", एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयामार्फत विकसित केलेल्या संगणीकृत "अमृत प्रणाली" द्वारे ऑनलाईन पध्दतीने थेट अनुदान देण्याचे आदेश दिनांक ११ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात आले.

(२) होय.

(३) होय. सदर योजना राज्यातील आदिवासी उपयोजना व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १६ जिल्हयांमध्ये राबविण्यात येणार आहे.

(४) व (५) सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल विकास), जिल्हा परिषद व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना या संकेत स्थळावर अंगणवाडी आहार समिती बँक तपशिल, लाभार्थी संख्या, योजनेसाठी खर्च इ. माहिती उपलब्ध करुन देणेसाठी लॉगीन आयडी व पासवर्ड उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच, आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना सदर प्रणालीमार्फत प्रत्येक आहार समितीच्या बँक खात्याची अद्यावतीकरण चाचणी सुरु असून सदर प्रणाली लवकरच सुरु करण्यात येत आहे.

---

**नाशिक जिल्हयातील एकलहरेजवळील अतिउच्च दाबाची वाहिनी नकाशा व नियमानुसार करण्याच्या मागणीबाबत**

**(२८) ७८५७६ (२८-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील एकलहरेजवळील कालवी, गंगापाडळी गावातील शेतातून टाकण्यात येणारी २२० दुहेरी परिपथ अतिउच्चदाबाची वाहिनी नकाशा व नियमानुसार करण्याची मागणी महापारेषण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) नाशिक जिल्हयात महापारेषण कंपनीतर्फे पिंपळगाव येथे २२० के.व्ही. उपकेंद्राचे काम पूर्ण झाले असून उपकेंद्रासाठीच्या २२० के.व्ही. एकलहरे-पिंपळगाव द्विपथ वाहिनीचे काम नकाशा व नियमानुसार सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोंभुर्णा पंचायत समितीतील वेळवा शौचालयाच्या कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२९) ७८७३१ (१८-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंभुर्णा पंचायत समितीतील वेळवा शौचालयाच्या कामात सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय

(३) असल्यास,चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१५-०६-२०१७) :** (१), (२), (३) व (४) पंचायत समिती, पोंभुर्णा अतंर्गत ग्राम पंचायत, वेळवा येथे शौचालय कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे गट विकास अधिकारी, पंचायत समिती ,पोंभुर्णा यांनी दि.१५/१०/२०१६च्या पत्रान्वये विस्तार अधिकारी (सा.) यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करून चौकशीचे आदेश देण्यात आलेले होते.सदर चौकशी अहवालानुसार संबंधित सरपंच व संबंधित सचिव यांचेकडून ४,५०,०००/-इतक्या रकमेची समप्रमाणात वसुलीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली होती.परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ,चंद्रपूर यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना गट विकास ,पंचायत समिती लेखा अधिकारी यासंदर्भात फेरचौकशीचे आदेश दिलेले होते .सदर दि.११/१/२०१७च्या चौकशी अहवालानुसार संबंधित सरपंच व संबंधित सचिव यांचेकडून रू.४,६०,०००/- इतकी रकमेची कार्यवाही प्रस्तावित केली आहे.

यासंदर्भात संबंधित सचिव यांना कारणे दाखवा नोटीस दि.१४/३/२०१७अन्वये देउन खुलासा मागविला आहे.संबंधित सचिव व संबंधित सरपंच यांचेवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

---

**उमरखेड विधानसभा मतदार संघातील मौजे कोरटा येथे आदिवासी सांस्कृतिक सभागृह बांधण्याबाबत**

**(३०) ७८७५३ (२८-०४-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड विधानसभा मतदार संघातील मौजे कोरटा येथे आदिवासी सांस्कृतिक सभागृह बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याकरिता दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी मा.

आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांना मा.मंत्री,आदिवासी विकास विभाग यांनी निर्देश दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यानुसार सदरहू प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय,
(३) तसेच या प्रस्तावाबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२५-०७-२०१७) :** (१) होय.
(२) नाही.
(३) सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

---

**येवला (जि.नाशिक) शहरामध्ये अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी व विद्यार्थीनीकरिता वसतीगृह बांधणेबाबत**

**(३१) ७८९९१ (२०-०४-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) शहरामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी व विद्यार्थीनीकरिता वसतीगृह बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हा प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०७-२०१७) :** (१) होय.
(२) राज्यातील प्रत्येक जिल्हयात अल्पसंख्याक विद्यार्थीनींसाठी वसतीगृहे बांधण्याची शासनाची योजना असून त्यानुसार नाशिक जिल्हयात अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या वसतीगृहासाठी सुयोग्य जागा उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी यांना सूचित करण्यात आले आहे. जागेच्या उपलब्धतेनुसार वसतीगृह बांधणेबाबत विचार करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने शाळांना स्वतंत्ररित्या नियतव्यय काढून देण्याचा निर्णय घेतला असल्याबाबत**

**(३२) ७९१८५ (२०-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनातर्फे गेल्या १५ वर्षापासून कायम विनाअनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांच्यातील कायम शब्द काढून सन २०१४-१५ मध्ये

स्वतंत्ररित्या नियतव्यय काढून देण्याचा निर्णय घेतला असूनही अद्यापपावेतो मूल्याकंन पात्र शाळांची यादी जाहिर करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान जळगांव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करुन निवेदन देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. विनोद तावडे (१८-०७-२०१७) :** (१) नाही.

(२) होय.

(३) शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले. तसेच, दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये पात्र शाळांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे. उच्च माध्यमिक शाळांच्या मूल्यांकनाबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे. शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या सुधारीत आकृतीबंधाबाबत आवश्यक कार्यवाही कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील शाहुवाडी पंचायत समिती विभागास गटशिक्षण अधिकारी नसल्याबाबत

**(३३) ७९८२५ (२०-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शाहुवाडी तालुका डोंगराळ व दुर्गम वाड्या-वस्त्यांचा तालुका म्हणून ओळखला जात असून तालुक्यात २७४ प्राथमिक तर ५० माध्यमिक शाळा आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाहुवाडी तालुक्याची भौगोलिक रचना पाहता वाड्या वस्त्यातील शाळांना गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने भेटी देताना अडणी निर्माण होत असून त्यातच पूर्णवेळ गटशिक्षण अधिकारी नसल्याने प्रभारी गटशिक्षण अधिकाऱ्यांना सर्वच शाळांना भेटी देणे व तपासणी करणे यावर मर्यादा येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहा शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या मंजूर पदांपैकी केवळ दोनच शिक्षण विस्तार अधिकारी कार्यरत आहेत या सर्व बाबींचा विपरीत परिणाम शाळांबरोबरच शिक्षण विभागातील कार्यालयीन तसेच शिक्षक आस्थापनेच्या कामकाजावरही होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी शाहुवाडी तालुक्यातील विद्यार्थांचा शैक्षणिक गुणवत्तेचा विकास होण्यासाठी पूर्णवेळ गटशिक्षण अधिकारी नेमणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२९-०७-२०१७) :** (१) होय खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदे (गटशिक्षणाधिकारी) हे पद पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरू असून बिंदूनामावली व आरक्षण निश्चितीसाठी प्रस्ताव त्रुटींची पूर्तता करून सामान्य प्रशासन विभागाकडे फेर सादर करण्यात येत आहे. मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे भरावयाच्या १२३ पदांबाबत आयोगाकडून दिनांक १३.०८.२०१७ रोजी परीक्षा आयोजित करण्यात आली असून, पात्र उमेदवारांच्या शिफारशीनंतर त्यांना पदस्थापना देण्यात येईल. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य सेवा परीक्षेद्वारे सरळ सेवेने भरावयाच्या १२ उमेदवारांची शिफारस करण्यात आली असून त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर उमेदवार विभागास नियुक्तीसाठी उपलब्ध होणार आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अल्पसंख्याक मुलींच्या वसतीगृहाबाबत

**(३४) ७९९९६ (२०-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी केंद्र शासनाने अल्पसंख्याक म्हणून घोषित केलेल्या २५ जिल्हयातील ४३ शहरामध्ये वसतीगृहाचे बांधकाम करण्याचा सन २०१० मध्ये शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार आता पर्यंत फक्त १० वसतीगृहाचे बांधकाम करण्यात आले असल्याचे दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहावर्षाचा कालावधी होऊनही अन्यत्र ठिकाणी जागा उपलब्ध नसल्याचे कारण सांगून वसतीगृह बांधकाम केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उर्वरीत वसतीगृहाचे बांधकामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२४-०७-२०१७) :** (१), (२) व (३) केंद्र शासन व राज्य शासनाच्या योजने अंतर्गत मुलींसाठी एकुण ३९ वसतीगृहे बांधण्यात येणार आहेत त्या पैकी १८ मुलींची वसतीगृहे सुरु असून १५ वसतीगृहांचे बांधकाम सुरु आहे. ६ वसतीगृहाच्या बांधकामासाठी जागा मिळणेबाबत संबंधित जिल्हाधिका-यांकडे पाठपुरवा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांदा शिक्षण प्रसारक मंडळाव्दारे संचालित शाळा आणि महाविद्‌यालयात सुरू असलेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याबाबत**

**(३५) ८०१३२ (२०-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदा शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर या संस्थेच्यावतीने सुरू असलेल्या बल्लारपूर जनता महाविद्‌यालयात कार्यरत असलेल्या मुख्याध्यापिकेवर खुनाच्या आरोपाखाली व गोडंपिपरी जनता विद्‌यालयात कार्यरत असलेल्या सहायक शिक्षकावर न्यायालयाने खुनाचा गुन्हा सिध्द झाल्यामुळे ते कारागृहात आजन्म शिक्षा भोगत आहेत तसेच दुर्गापूर जनता विद्‌यालयात कार्यरत असलेल्या मुख्याध्यापिकेला लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले असंताना सुध्दा संस्था चालकांनी या तिनही शिक्षकाच्या नावे स्वेच्छा निवृत्ती घेण्याकरीता बनावट कागदपत्र तयार करून त्या आधारे पेन्शन केस मंजूर करून शासनाची लाखो रूपयांची फसवणूक केली असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००५ पासून शिक्षकांची भरती बंद असतांना सुध्दा सदर संस्थेने शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून लाखो रूपयांच्या व्यवहारातून अनेक शिक्षक व कर्मचाऱ्यांची नियमबाहय भरती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२६-०७-२०१७) :**(१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अनेक ग्रामपंचायतींचे पाणीपुरवठा योजनेचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३६) ८०१३६ (२०-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक ग्रामपंचायतींचे पाणीपुरवठा योजनेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत तर नवीन प्रस्ताव शासन स्वीकारत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३ ते ४ हजार ग्रामपंचायतींच्या योजनांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे परंतु निधी उपलब्ध केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन प्रस्ताव स्वीकारणेसाठी व निधी मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०७-२०१७) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

(३) केंद्र शासनाने केवळ प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजना, अर्सेनिक/ फ्लोराईडबाधित संसद आदर्श ग्राम योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या गावे/वाड्या व ODF Verified ग्रामपंचायतीमधील गावे/वाड्यांसाठी नवीन/पुनरुज्जीवन/ आधुनिकीकरण योजना घेण्याबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत. तसेच ग्रामीण पेयजल हा राज्याच्या अखत्यारीतील विषय असल्याने राज्याने जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याच्यादेखील सुचना दिलेल्या आहेत. या अनुषंगाने ज्या योजनांना प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे व कामे अद्याप सुरु केलेली नाहीत, अशा योजनांचा सन २०१७-१८च्या कृती आराखड्यामध्ये समावेश करुन यासाठी १००% राज्य हिश्श्यांतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत शासनाने दि.३.५.२०१७ च्या पत्रान्वये सुचना दिलेल्या आहेत.

राज्यातील ग्रामीण भागातील पाणी पुरवठा क्षेत्रात सुधारणा करुन जनतेस स्वच्छ आणि पुरेसे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने दि.७.५.२०१६च्या शासन निर्णयान्वये स्वत:चा सर्वसमावेशक "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम" सुरु केला असून त्यामध्ये राज्यातील एकूण १००३ नवीन योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात सहाय्यक प्रकल्प अधिकारी पदे रिक्त असल्याबाबत**

**(३७) ८०३१६ (२८-०४-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील शहापूर, जव्हार,डहाणू, पेण व घोडेगांव येथे सहाय्यक प्रकल्प अधिकारी पद मागील ६ महिन्यांपासून रिक्त असल्याबाबतच्या तक्रारी लोकप्रतिनिधी, स्थानिक नागरिकांनी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही पदे रिक्त असल्याने आदिवासी विकास विभागाच्या अनेक योजना राबविण्यास विलंब होत असल्याने आदिवासी समाजातील नागरिकांमध्ये नाराजी पसरलेली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१९-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

अशा तक्रारी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, अपर आयुक्त, ठाणे यांच्या अधिनस्त कार्यालयात सहायक प्रकल्प अधिकारी संवर्गाची १२ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे पदोन्नती तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस झालेल्या १८ उमेदवारांमधून भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची शैक्षणिक कर्ज योजनेची रक्कम वाढविण्याबाबत**

**(३८) ८०५६४ (२०-०४-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची शैक्षणिक कर्ज योजनेची रक्कम ५ लाखावरुन १० लाख करण्याबाबत अल्पसंख्यांक विभागाकडून वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, याचा प्रत्यक्ष फायदा केव्हापासून मिळणार आहे,

(४ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०७-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) सदर बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक करण्याबाबत

**(३९) ८०५९४ (२०-०४-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी असलेल्या मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळावर अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक करण्यात न आल्याने महामंडळाला धोरणात्मक निर्णय घेण्यात अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त नियुक्त्या करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२४-०७-२०१७) :** (१) नाही, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळावर प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग व व्यवस्थापकीय संचालक हे शासकीय संचालक कार्यरत असल्यामुळे धोरणात्मक निर्णय घेण्यात अडचणी येत नाहीत.

(२) अध्यक्ष व अशासकीय संचालक यांची नेमणूक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात संजय गांधी निराधार योजनेसह विविध योजनात अनुदानात वाढ करणेबाबत

**(४०) ८१६७५ (२१-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन-१९८० पासून संजय गांधी योजना सुरु केली,त्यांनतर भुमिहीन शेतमजुर महिला ६५ वर्षा वरील आर्थिक निराधार व्यक्तीसाठी केंद्र शासनाने २००४ मध्ये श्रावणबाळ योजना सुरु केली असून या योजना अतंर्गत सर्व लाभार्थ्यांना केवळ ६०० रुपये मानधन दिले जाते तथापि, सदर मानधन तुटपुजे असून यामध्ये अद्यापपर्यंत शासनाने वाढ केली नाही,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (११-०७-२०१७) :** (१), (२) व (३) विशेष सहाय्य कार्यक्रमाअंतर्गत अंतर्भूत असलेल्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना सद्या रू. ६०० प्रतिमहा प्रतिलाभार्थी एवढे अर्थसहाय्य देण्यात येते.

सदर योजनेतील लाभार्थ्यांच्या मासिक अनुदानात वाढ करण्याच्या प्रस्तावावर विचारविनिमय सुरू आहे.

---

**भंडारा जिल्हयातील शौचालय बांधकामाचे उद्दीष्ट पुर्ण करणेबाबत**

**(४१) ८१७९८ (२०-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हा परिषदेला सन २०१६-१७ मध्ये संपूर्ण जिल्हा हागणदारीमुक्त करण्यासाठी ४३२ ग्रामपंचायत हद्दीत वैयक्तिक स्वरुपाच्या ५९५०१ शौचालयाची निर्मिती माहे मार्च, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट देण्यात आले असून अद्यापही २५६१० शौचालय बांधणे शिल्लक आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्हा हागणदारीमुक्त करण्यासाठी २५६१० शौचालयाचे उद्दीष्ट पूर्ण करण्याचे निर्देश शासनाने जिल्हा प्रशासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०७-२०१७) :** (१), (२) व (३) भंडारा जिल्हा परिषदेला सन २०१६-१७ मध्ये ग्रामीण क्षेत्रात सन २०१२ च्या पायाभुत सर्वेक्षणानुसार वैयक्तिक शौचालय बांधकामाचे उद्दीष्ट ५९५०१ इतके होते व ते त्यांनी ३१ मार्च २०१७ पर्यत पूर्ण करून संपूर्ण भंडारा जिल्हा हागणदारीमुक्त झालेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर येथे सेट टॉप बॉक्स बसविण्याकरिता ग्राहकांकडून वेगवेगळे दर आकारण्यात येत असल्याबाबत**

**(४२) ८१९६६ (२०-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१ ) चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मनोरंजन विभागाने शहरी तथा ग्रामीण भागात केबल ग्राहकांना सेट टॉप बॉक्स बसविण्याची मुदत दिनांक ३१ मार्च पर्यंत वाढवली असून सेट टॉप बॉक्स बसविण्याकरिता ग्राहकांकडून वेगवेगळे दर आकारण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (२०-०७-२०१७)** : (१) फेज ४ अंतर्गत समाविष्ट, ग्रामीण क्षेत्रात सेट टॉप बॉक्स बसविण्याची मुदत दि.३१.०३.२०१७ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

सेटटॉप बॉक्ससाठी छापील किंमतीपेक्षा जास्त किंमत आकारल्याबाबत वैध मापन शास्त्र यांच्याकडे नोव्हेंबर, २०१६ मध्ये एक तक्रार प्राप्त झाली होती.

(२) या तक्रारीची चौकशी करण्यात आली. चौकशीअंती अशी बाब आढळून आली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील शालेय पोषण आहार शिजविणाऱ्याचे मानधन थकित असल्याबाबत**

**(४३) ८२१९० (२०-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या स्वयपांकी,मदतनिस,बचत गट यांचेगत ६ महिन्यापासुन मानधन थकित असल्याने कामगार महिलांच्या कुटूंबावर उपासमारीची पाळी आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय पोषण आहार शिजविण्याचे कंत्राट महिला बचत गटांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२८-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्यासाठी वाशिम जिल्हयातील काही शाळांनी महिला बचत गटांना काम दिले आहे.

(३) वाशिम जिल्हयातील शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे जानेवारी, २०१७ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले असून मार्च, २०१७ पर्यतचे मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासींसाठी सांस्कृतिक धोरण तयार करण्याबाबत**

**(४४) ८३०७१ (२८-०४-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने सन २००४ साली अध्यादेशाद्‌वारे ज्या राज्यांमध्ये आदिवासींचा समावेश आहे त्या राज्यांनी आदिवासींसाठी सांस्कृतिक धोरण तयार करण्यासाठी सूचना मागविल्या होत्या मात्र सन २००४ पासून राज्य शासनाकडून आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे माहे फेब्रुवारी,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींचे सांस्कृतिक धोरण न राबविल्यामुळे आदिवासी समाजाचा विकास होऊ शकला नाही तसेच राज्य शासनाने सांस्कृतिक धोरणाची अंमलबजावणी न केल्यामुळे आदिवासींच्या मौखिक साहित्यामधील गीतांचे अजूनही संशोधन झाले नसून ऐतिहासिक दस्तऐवज,ताम्रपट, शिलालेख,विविध प्रकारची शस्त्रे यांचे संशोधन प्रलंबित आहे, याशिवाय आदिवासींमधील लोप पावत चाललेल्या रूढी,परंपरा या लघुपट,माहितीपटाच्या माध्यमातून नोंद करण्यात येत होत्या त्याचे कामसुद्धा सन २०११ पासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व आदिवासींसाठी सांस्कृतिक धोरण तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०७-२०१७) :** (१) दिनांक १० मार्च, २०१७ रोजीच्या महाराष्ट्र टाईम्स, पुणे या वर्तमानपत्रात याबाबतची बातमी प्रसिध्द झालेली आहे.

(२) , (३) व (४) केंद्र व राज्य शासनामार्फत आदिवासींच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाकरीता राबविण्यात येणा-या योजनांचा आदिवासींच्या जीवनावर झालेल्या परिणामांचे मूल्यमापन करणे, आदिवासी जीवन व विकास यांचेशी संबंधित विषयावर संशोधन करणे, आदिवासी कला व संस्कृती जतन करणे या उद्देशाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आलेली आहे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून आदिवासी संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याच्या हेतुने आदिवासींच्या सांस्कृतिक व कला जीवनावर आधारीत विविध विषयावर अद्यापपर्यंत ९० लघुपट तयार करण्यात आलेले आहेत. आदिवासी कला व संस्कृतीचे जतन व संवर्धन करणाच्या उद्देशाने सदर संस्थेमार्फत आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय चालविले जात असून संग्रहालयात आदिवासी जीवन व संस्कृतीचे दर्शन घडविणा-या मौल्यवान व दुर्मिळ वस्तुंचा संग्रह करण्यात आलेला आहे. अशाप्रकारे आदिवासी संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याचे काम आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून करण्यात येत आहे.

---

### मागासवर्ग आयोगावर इतर मागासवर्ग समाजास प्रतिनिधीत्व देण्याबाबत

**(४५)** ***८३२१७ (०६-०५-२०१७).*** **श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी घटीत केलेल्या राज्य मागासवर्ग आयोगावर इतर मागासवर्ग समाजाला प्रतिनिधीत्व देण्यात आलेले नाही, त्यामुळे त्या समाजात असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागासवर्ग आयोगावर इतर मागासवर्ग समाजाला प्रतिनिधीत्व न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास,इतर मागासवर्ग समाजाला प्रतिनिधित्व देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

शासनाने दिनांक ४ जानेवारी, २०१७ व दि.१० जानेवारी,२०१७ रोजीच्या अधिसुचनेन्वये राज्य मागासवर्ग आयोगाचे पुनर्गठन केलेले आहे. सदर आयोगावर एक अध्यक्ष, एक तज्ञ सदस्य व इतर ८ सदस्य अशी एकूण १० पदे असून त्यापैकी ३ पदांवर इतर मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींना प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुकथनकर समितीच्या अहवालातील शिफारशींची तातडीने अंमलबजावणी होण्याबाबत**

**(४६) ८३४३५ (२८-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासींच्या विकासाला चालना मिळावी व रोजगार, शिक्षण, आरोग्य व कुपोषण यासारख्या समस्या दूर व्हाव्यात यासाठी सन ११९२-९३ मध्ये शासनाने नेमलेल्या सुकथनकर समितीने आदिवासींसाठीची अर्थसंकल्पीय तरतूद ही आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात करण्याची महत्त्वाची शिफारस शासनास केली होती, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, गत २० वर्षात सदर शिफारसीची शासनाकडून अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, सदरहू शिफारशीअन्वये आदिवासींसाठीची अर्थसंकल्पीय तरतूद ही आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (१८-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९% आदिवासी लोकसंख्या आहे. सदर लोकसंख्या विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासीसांठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची शिफारस सुकथनकर समितीने केली. सदर शिफारशीनुसार टप्प्या टप्प्याने ९ टक्के पर्यंत नियतव्यय उपलब्ध करुन द्यावयाचा होता. त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने प्रतिवर्षी

नियतव्यय वाढ होऊन सन २००५-०६ पासून सरासरी ९% नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सन २०१४-१५ पासून आजतागायत सन २०११ च्या जनगणनेनुसार असलेल्या आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात म्हणजेच सुमारे ९.४% इतका नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सरकारी परवाना धारक सावकाराची व्याप्ती तालुका स्तरावर न ठेवता जिल्हा पातळीवर करण्याबाबत**

**(४७) ८३४८९ (२१-०४-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल नरखेड(जि.नागपुर) तालुक्यातील शेतकरी दरवर्षी होणा-या अवेळी पाऊस, नापिकीमुळे आर्थिक संकटात सापडला असल्याने बँकेच्या कर्जाची परत फेड करू शकत नसल्याने त्यांना दुबार कर्ज मिळत नाही त्यामुळे शेतकरी सावकाराकडून कर्ज घेत आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरकारी परवानाधारक सावकार तालुका स्तरावर कमी असून त्यांच्याकडे आर्थिक भांडवल मर्यादीत असल्यामुळे सर्व शेतक-यांना सरकारी परवाना धारक सावकार कर्ज देण्यास असमर्थ असल्याने शेतक-यांना खाजगी सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी सावकाराकडून शेतकऱ्याना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो त्यामुळे सरकारी परवाना धारक सावकारांची मर्यादा तालुका स्तरापर्यंत मर्यादीत न ठेवता जिल्हा स्तरापर्यंत वाढविण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (१८-०७-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

काटोल व नरखेड तालुक्यात सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या दोन वर्षामध्ये ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या पात्र व संमती देणाऱ्या शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्यात आले आहे. सन २०१६-१७ मध्ये पैसेवारी ५० पैशापेक्षा जास्त असल्याने कर्जाचे पुनर्गठन करण्यात आलेले नाही.

काटोल व नरखेड तालुक्यामध्ये अनुक्रमे ४१ व १० परवानाधारक सावकार असून सदर सावकार त्यांचेकडील भांडवलानुसार कर्ज पुरवठा करतात. या दोन्ही तालुक्यात पुरेशा प्रमाणात परवानाधारक सावकार उपलब्ध असून खाजगी सावकारीबाबतची कोणतीही तक्रार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचे कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) संबंधीत परवानाधारक सावकारांनी जिल्हा परवाना क्षेत्राची मागणी केल्यास आवश्यक कागदपत्रांची तपासणी करुन जिल्हा स्तरापर्यंत परवाना देण्याची तरतूद महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मध्ये करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलडाणा जिल्ह्यातील जिजामाता साखर कारखान्यातील कामगारांच्या विविध मागण्यांबाबत**

**(४८) ८३७३१ (२१-०४-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्ह्यातील जिजामाता साखर कारखान्याचा विक्री प्रस्ताव तात्काळ रद्द करून कारखाना पूर्ववत सुरू करण्यात यावा, कामगारांचे थकीत वेतन देण्यात यावे, किनगावराजाचे ठाणेदार व चार पोलिस कर्मचा-यांना बडतर्फ करण्यात यावे यासह इतर मागण्यांसाठी जिल्हा साखर कारखाना कामगार समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्‌नुसार उपरोक्त मागण्यासदंर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-०७-२०१७) :** (१) खरे आहे.
(२) व (३) प्रश्नांकित सहकारी साखर कारखाना सध्या अवसायनात असून, कारखान्याची चल अचल मालमत्ता सरफेसी कायद्यांतर्गत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या ताब्यात आहे. सरफेसी कायदा (Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act २००२) हा केंद्र शासनाचा कायदा असून त्यानुसार केल्या जाणाऱ्या कार्यवाहीमध्ये राज्य शासनाचा हस्तक्षेप करता येत नसल्यामुळे राज्य शासनाकडून कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत**

**(४९) ८४२३३ (२८-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांच्या ६५ मंजूर पदांपैकी तब्बल १९ पदे रिक्त असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०१७ च्या अंतिम सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकारची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि राज्यातील आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (१९-०७-२०१७) :** (१) होय.

आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक संवर्गातील ४३६ मंजूर पदांपैकी १४२ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) मुख्याध्यापक हे पद पदोन्नतीने भरावयाचे असल्याने सदर रिक्त पदे भरण्याबाबत संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचेकडून पदोन्नतीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील १७७ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये वैध मापन नियंत्रण विभागाने तपासणी केल्याबाबत

**(५०) ८४६७८ (२०-०४-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १७७ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये वैध मापन नियंत्रण विभागाने तपासणी केली असता शेतक-यांकडून कमी दरात घेतल्या जाणा-या मालाच्या मापातही फसवणूक होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वजने-मापांचे मुद्रांकन न केल्याबाबत २४१ प्रकरणे तर अप्रमाणिक वजने वापरल्या प्रकरणी ४३ प्रकरणे नोंदविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने शेतक-यांची फसवणूक करणा-या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच असे प्रकार पुनःश्च घडू नयेत याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०७-२०१७) :** (१) माहे सप्टेंबर,२०१६ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील व्यापा-यांकडील वजने व तोलन उपकरणांची तपासणी केली असता २८४ आस्थापनांवर वैध मापन शास्त्र अधिनियम व त्या अंतर्गत नियम यातील तरतुदींचा भंग केल्याबद्दल खटले दाखल करण्यात आले आहेत.

(२) होय, हे खरे आहे. वजन-मापांचे मुद्रांकन न केल्याबाबत २४१ प्रकरणे व ४३ इतर प्रकरणे कि ज्यामध्ये तोलन उपकरणाच्या क्षमतेच्या १० टक्के वजने न ठेवणे,पडताळणी प्रमाणपत्र प्रदर्शित न करणे, नियमानुसार नसलेल्या आवेष्टीत वस्तू विक्रीसाठी ठेवणे याबाबत नोंदवण्यात आली आहेत.

(३) तपासणीमध्ये दोषी आढळलेल्या वरील २८४ आस्थापनांवर वैध मापन शास्त्र अधिनियमानुसार कायदेशीर कारवाई सुरू आहे.असे प्रकार पुन:श्च घडू नयेत याबाबत वेळोवेळी विशेष मोहिमांचे आयोजन करण्यात येत असते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.